## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०९ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्रवेश परिचय कार्यक्रमांतर्गत योग्यशास्त्र विभागातील डॉ. लीना चौधरी यांचे "आरोग्यासाठी योग" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे उपस्थित होते.

यावेळी डॉ. लीना चौधरी म्हणाल्या की, शारीरिक, मानसिक, सामाजिक, पर्यावरण आणि अध्यात्म इ. गोष्टी आरोग्यासाठी महत्त्वाच्या आहेत. योगाभ्यास केल्यामुळे शरीरशुद्धी क्रिया होते तसेच योग हे अनुभूतीचे शास्त्र आहे असे म्हणत त्यांनी चांगल्या आरोग्यासाठी वयाच्या तेराव्या वर्षापासून योगाभ्यासाला सुरुवात व्हावी असे म्हणत अनेक व्यायामाचे प्रकार सांगितले सोबतच व्यायाम कसा करावा, कधी करावा आणि कधी करू नये अशी महत्त्वपूर्ण माहिती देत सुदृढ आरोग्यासाठी योग अभ्यासाची भूमिका स्पष्ट केली. त्यामध्ये त्यांनी आसन, वज्रासन, प्राणायाम, सूक्ष्म व्यायाम, अशा विविध व्यायाम प्रकारांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात प्रा. म. सू. पगारे म्हणाले की, सकाळी लवकर उठून योग करणे चांगल्या आरोग्यासाठी व दीर्घायुष्यासाठी गरजेचे आहे. स्वयं शिस्तीशिवाय माणसाचा विकास होऊ शकत नाही जी माणसं असा संकल्प करतात तीच आयुष्यात काहीतरी करू शकतात, योग अभ्यासामुळे संपूर्ण शरीरात लवचिकता यायला लागते, श्वासोच्छवासाची क्रिया सुरळीत होते त्यामुळे विद्यार्थ्यांनी रोज योगाभ्यास करावा असे आवाहन उपस्थितांना केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशाळेतील विद्यार्थी स्वप्निल जाधव तर आभार प्रदर्शन हर्षदा महाजन यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रशाळेतील प्राध्यापक डॉ. प्रीती सोनी, डॉ. दीपक खरात, कृष्णा सदानशिव, सुदर्शन भवरे, स्नेहा गायकवाड, प्रतिभा गलवाडे, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हणे यांच्यासह प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०९ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळा आणि भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि.१९ सप्टेंबर रोजी भारतीय ज्ञान परंपरा (IKS) या विषयावर विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या सभागृहात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार असून अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्रमुख अतिथी म्हणून दिल्ली येथील वेब भारती संस्थेचे सल्लागार प्रा. प्रशांत पोळ, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, अमरावती येथील डॉ. मयूरेश शिंगरुप प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत.

कार्यशाळेत वेब भारती संस्थेचे सल्लागार प्रा. प्रशांत पोळ हे बीजभाषण करतील. तसेच भारतीय ज्ञान परंपरा (IKS) या विषयावर राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, अमरावती येथील डॉ. मयूरेश सिंगरुप हे मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नोंदणी अनिवार्य असून विद्यापीठाच्या https://docs.google.com/forms/d/e या लिंकवरुन विनामूल्य नोंदणी करता येणार असून सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येईल. या कार्यशाळेत जळगाव, धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील भारतीय ज्ञान परंपरा विषय शिकविणा-या शिक्षकांनी सहभागी व्हावे असे आवाहन कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा. रामचंद्र भावसार यांनी केले आहे.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ — दिनांक: ९ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता